## अटी व शर्ती :-

1. एका पेक्षा जास्त तालुक्यातील कार्यालया करिता वेगळे वेगळे दर पत्रक भरावे व त्याप्रमाणे नमूद करावे.
2. एका तालुक्याकरिता एकच दर पत्रक सादर करावे.
3. भाड्याने द्यायचे कार्यालय हे उत्तम अवस्थेत असावे व करार कालावधीत तसेच उत्तम अवस्थेत असेल याची काळजी घ्यावी.
4. पुरवठादार हे कार्यालयाचा रख रखाव (maintenance) करिता जबाबदार असेल. उदा. रंग काम, सिविल वर्क इत्यादी
5. पुरवठादार हा मालक/संस्था/भागीदारी कंपनी इत्यादी असू शकेल व योग्य ठिकाणी नोदणी केले असावी.
6. पुरवठादार यांच्याकडे किमान १000 ते १२०० स्के. फुट बांधकाम झालेले असावे.
7. पुरवठादार यांचे कडे किमान दोन संडास व बाथरूम असणे आवश्यक आहे.
8. पुरवठादार यांचे कडे मुबलक पाण्याची सोय असली पाहिजे.
9. सर्व खोल्यामध्ये विद्युत पुरवठा केला असला पाहिजे.
10. पुरवठादार यांचेकडे पॅन (PAN) कार्ड असणे आवश्यक आहे.
11. पुरवठादार यांनी आपल्या मालमत्तेवरील सर्व करांचा भरणा केला असला पाहिजे.
12. सर्व प्रकारचे टॅक्स, परवानग्या, विमा किंवा इतर प्रकारचे मंजुऱ्या करिता ज्याचे दर पत्रक निवडले जाईल ते जवाबदार राहतील.
13. कार्यालय हे सामान्यत: हे सर्व कार्यालयीन दिवसांकरिता २४ तास ताब्यात राहील. कार्यालय हे रविवार सहित इतर सुट्यांच्या दिवसांत सुद्धा सुरु राहु शकते.
14. जिल्हा अभियान कार्यालय, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यवतमाळ हे कुठल्याही प्रकारच्या नुकसान, तुटफुट किंवा अपघात यांस जवाबदार असणार नाही.
15. घर मालक हे कार्यालया करिता वेगळे विद्युत पुरवठा करण्याकरिता जवाबदार असतील.
16. पुरवठादार हे वैधानिक बाबी मान्य करण्यास बांधील असेल.
17. पुरवठादार हा मालमत्तेवरील सर्व प्रकारचे कर भरण्यास बांधील असेल.
18. दर पत्रकातील दर हे करार सुरु झाल्यापासून एक वर्ष करिता वैध असतील व कुठल्याही कारणाने दर वाढवून मिळणार नाही तसेच करार संपण्याच्या आधी जागा खाली करून देता येणार नाही.
19. कोणत्याही सबबी अंतर्गत अग्रिम देता येणार नाही.
20. अटी व शर्ती मधील कुठल्याही अटीचा अर्थ किंवा कामे यांचा अर्थ लावण्यात वाद निर्माण झाल्यास मध्यस्थ ठरविण्याचा अधिकार हा जिल्हा अभियान व्यवस्थापन कार्यालय यांना असेल.

21. पुरवठादार यांना करार कालावधीत जिल्हा अभियान कार्यालयाची लेखी पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करारातील जबाबदाऱ्या यांचे इतरांना हस्तांतरण, प्रतिज्ञा किंवा उपकरार करता येणार नाही.
22. पुरवठादार हा राज्य/केंद्र शासनाच्या सर्व नियम अवलंब करण्यास बंधनकारक असेल.
23. पुरवठादार यांनी त्यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या पूर्ण करण्या करिता नेमलेल्या व्यक्ती/कर्मचारी/प्रतिनिधी/मध्यस्थ इत्यादी यांचे मानधन,पगार व भत्ते इत्यादीसाठी जिल्हा अभियान कार्यालय जबाबदार राहणार नाही.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.
तथा जिल्हा अभियान संचालक
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियान
यवतमाळ